# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 352/2023 दिनांक : 13.09.2023

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**मुदखेड :–** दिनांक 11.09.2023 रोजी चे 22.20 वा. चे सुमारास, **आरोपीचे हॉटेल समोर नवी आबादी मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा गैबीपीर बाबा दर्गा मुदखेड येथे उर्साची तयारी पाहाण्याकरीता गेला असता यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून जुन्या किरकोळ वादावरून शिवीगाळ करून धमकी दिली. तसेच फिर्यादी हा साक्षीदारा सोबत मोटार सायकलवर बसुन परत येत असतांना आरोपीतांनी तलवारीने डोक्यात मारून गंभीर जखमी करून खुन करण्याचा प्रयत्न केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी मोहम्मद इकबाल पि. बाबुलाल खुरेशी, वय 38 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. खुरेशी गल्ली मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे मुदखेड** गुरन 187/2023 कलम 307, 324, 323, 504, 506, 34 भादवी सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बी. आर. कांबळे, मो.क्रं. 9823925710** हे करीत आहेत.

## 2)स्विप्ट डिझायर कार चोरी :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 10.09.2023 रोजी चे 20.00 ते दि. 11.09.2023 चे 06.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीच्या घराजवळील महादेव मंदीराच्या मोकळया जागेत काकांडी ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची स्विप्ट डिझायर कार क्रमांक एमएच–26/एन–6087 किंमती 2,50,000/–रूपयाची फिर्यादीचे घरासमोर रोडवर महादेव मंदीराच्या मोकळया जागेत लावली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी अनिरूध्द उध्दव कोंके, वय 24 वर्षे, व्यवसाय चालक रा. कांकाडी ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 660/2023 कलम 379, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मटवाड, मो. क्रं. 9922778115** हे करीत आहेत.

## 3)जनावर चोरी :–

**1)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 11.09.2023 रोजी चे 02.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीच्या घराजवळ राहुलनगर के–2 सिडको नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा जेवण करून झोपला असता फिर्यादीच्या आवारातील वराहाचा आवाज आल्याने उठुन वराहाकडे जावुन पाहिला असता यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून आवाराचे समोर रोडवर एक अशोक लिलँण्ड कंपणीचे चार चाकी पिकअप टेम्पो क्रमांक एमएच–22/एएन–3791 या वाहनामध्ये 30 वराह एकुण किंमती 60,000/–रूपयाचे चोरून नेत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी लखनसिंग पि. बाबासिंग जुने, वय 25 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. राहुलनगर के–2 सिडको नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 662/2023 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/173 माने, मो. क्रं. 8788371187** हे करीत आहेत.

## 4)प्राणी संरक्षण अधिनियम :–

**विमानतळ :–** दिनांक 12.09.2023 रोजी चे 15.30 वा. चे सुमारास, **शंकरराव चव्हाण कामठा चौक नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने स्वतःचे फायदयासाठी अवैधरित्या एक तांबडया रंगाची गाय किंमती 20,000/–रूपयाची कत्तली करीता जवळ बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/2733, दत्तात्रय कुमार गंगावरे, ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 308/2023 कलम 5(अ), 5(ब), 9(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/173 माने, मो. क्रं. 8788371187** हे करीत आहेत.

## 5)अपघात :–

**तामसा :–** दि. 11.09.2023 रोजी चे 19.30 वा. चे सुमारास, **राजावाडी फाटा भोकर ते हिमायतनगर जाणारे रोडवर मौ. तामसा ता. हदगांव जि. नांदेड येथे, मयत नामे श्याम मारोती राठोड, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा. येवली तांडा ता. हदगांव जि. नांदेड** हा त्याची मो सा क्रमांक एमएच–26/बीवाय–5337 वर बसुन भोकर येथुन गावाकडे येत असतांना राजवाडी फाटा येते आला असता हिमायतनगर कडुन येणारी कार क्रमांक एमएच–24/व्ही–268 च्या चालकाने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगात हयगय व निष्काळजीपणे चालवुन यातील मयताचे मो सा ला समोरून जोराची धडक देवुन त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी साहेबराव तुकाराम राठोड, वय 45 वर्षे, रा. येवली तांडा ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरनं. 86/2023 कलम 279, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री दळवे, मो.क्र. 7744827771** हे करीत आहेत.

## 6)भारतीय हत्यार कायदा :–

**शिवाजीनगर :–**दिनांक 12.09.2023 रोजी चे 15.00 वा. चे सुमारास, **आंबेडकरनगर पाटी जवळ नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक गावठी बनावटी सिलव्हर रंगाची लोखंडी पिस्टल, एक जिवंत काडतुस ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री दशरथ आकुंश आडे, ने. स्थागुशा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 307/2023 कलम 3/25, भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गायकवाड, मो.क्र. 9370933727** हे करीत आहेत.

## 7)जुगार :–

**1)अर्धापुर :–** दिनांक 12.09.2023 रोजी 16.55 वा. चे सुमारास, **साईबार अँड रेस्टॉरंट पाठीमागे मोकळया जागेत भोकर फाटा ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांने बिना परवाना बेकायदेशिररित्या मिलन डे नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी व साहित्य 1540/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2313 भीमराव हिराराम राठोड, ने. पोस्टे अर्धापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 343/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/631 देशमुख, मो.क्रं. 9923647631** हे करीत आहेत.

**2)अर्धापुर :–** दिनांक 12.09.2023 रोजी 16.30 वा. चे सुमारास, **चोरंबा शिवारातील पाटी जवळील बंजारा हॉटेलचे समोर सार्वजनिक रोडवर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण ओपण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी व साहित्य 1260/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/संभाजी माधवराव गोरकर, ने. पोस्टे अर्धापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 344/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1074 नरवाडे, मो. क्रं. 9823044724** हे करीत आहेत.


जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड